# वार्तापत्र

पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली
दि. २४.०९.२०१८

दिनांक २१ सप्टेंबर ते २७ सप्टेंबर दरम्यान नक्षलवाद्यांनी पुकारलेल्या बंद च्या पार्श्वभुमीवर ठिकठिकाणी नागरीकांचा प्रखर विरोध दिसून येत आहे. नक्षलवाद्यांनी पुकारलेल्या बंद दरम्यान नागरीकांकडून कोणताच प्रतिसाद नक्षलवाद्यांना मिळत नसल्याचे दिसून येत आहे. नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण होण्यासाठी नक्षलवादी विविध गावांत बॅनर व पत्रके टाकुन बंदबाबत नागरीकांमध्ये दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत.परंतू नक्षलवाद्यांच्या या नितीला नागरीकांचा पूर्ण विरोध दिसून येत आहे.मौजा बामणी हद्दीतील सिरोंचा ते आलापल्लीकडे जाणा–या मार्गावर कंबलपेटा फाट्यावर नक्षलवाद्यांनी लावलेल्या बॅनर व पत्रकांची येथील १५० ते २०० नागरीकांनी एकत्र येवून होळी केली. यावेळी नागरीकांनी नक्षलवाद्यांच्या भुलथापांना आपण बळी पडणार नसून नक्षलवाद्यांचा समूळ नायनाट करण्यासाठी आम्ही सदैव प्रशासनासोबत असल्याची भावना व्यक्त करुन नक्षलवाद मुर्दाबाद अश्या घोषणा दिल्या.



